# नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम

८ वा माळा, बेलापूर भवन, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर.

जा.क्र.नमुंमपा/परि/प्रशा/७४९ /२०२१ दिनांक : २८/०४/२०२१

## जाहिर नोटीस

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमातील अधिकारी/कर्मचारी यांच्या संबंधी चौकशी अधिकारी म्हणून विभागीय चौकशीचे कामकाज पार पाडण्याकरीता खालील अटी व शर्तीवर अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) शासकीय अथवा निमशासकीय आस्थापनामध्ये प्रशासन अधिकारी म्हणून किमान ५ वर्ष कामकाज केलेले असणे आवश्यक आहे.

२) सेवानिवृत्त तहसीलदार, उपजिल्हाधिकारी, मंत्रालयातील कक्ष अधिकारी, सहसचिव, उपसचिव, सचिव अर्ज करु शकतील.

३) किमान १० वर्ष वकील म्हणून प्रत्यक्षात कामकाज करणारे वकील अर्ज करु शकतील. वकील अथवा यापुर्वी चौकशी अधिकारी म्हणून काम केलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल. वकीलांमध्येही कामगार/औद्योगिक न्यायालयातील वकीलांना प्राधान्य असेल.

४) कामगार कायदयाचे व प्रशासकीय कामकाजाचे ज्ञान आवश्यक.

५) चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती हंगामी अगदी तात्परत्या कालावधीकरीता असेल..

६) चौकशी अधिकारी यांना नियमित अधिकारी/कर्मचारी यांना देय असलेले कोणतेही लाभ अथवा रजा सवलत असणार नाही.

७) चौकशी अधिकारी यांना मासिक एकरकमी ठोक मानधन देण्यात येईल. मानधनाव्यतिरीक्त कोणतेही लाभ अथवा भत्ते देय असणार नाहीत.

८) चौकशी अधिकारी यांना प्रती दिन किमान ४ तास चौकशीकरीता हजर राहून तातडीने कामाचा निपटारा करणे बंधनकारक राहिल तसेच प्रती महिना किमान ७ चौकशींचे कामकाज पुर्ण करुन चौकशी अहवाल निम्नस्वाक्षरीतांना सादर करणे बंधनकारक राहील. काम समाधानकारक नसल्यास किंवा परिवहन उपक्रमास आवश्यकता नसल्यास १ महिना अगाऊ सुचना देऊन नियुक्ती रद्द करता येईल किंवा स्वत:हून चौकशी अधिकारी पद सोडावयाचे झाल्यास १ महिन्याची आगाऊ लेखी सुचना देणे आवश्यक राहील.

९) चौकशी अधिकारी या पदाकरीता अर्ज करण्यासाठी दि. ३१/०३/२०२१ रोजी वय ६७ वर्षापेक्षा जादा नसावे.

१०) अर्ज टंकलिखीत स्वरुपात (बायोडेटा) व त्यावर पत्रव्यवहाराकरीता पिनकोडसह पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांकासह सादर करण्यात यावा.

११) चौकशी अधिकारी या पदाकरीता सर्व आवश्यक कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्रांसह व वकीलांनी बार काउन्सिलच्या सदस्यत्वाचा दाखल्यासह अर्ज दि. १८/०५/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम, ८ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई -४०० ६१४ या पत्त्यावर स्वत: येवून अथवा पोस्टाने पोचतील अशा बेताने पाठविण्यात यावेत. कोणत्याही कारणास्तव अर्ज उशिरा प्राप्त झाल्यास त्यांचा विचार करता येणार नाही.

१२) सर्व अर्ज स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार/संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीतांनी राखून ठेवले आहेत.

परिवहन व्यवस्थापक

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम